सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर
(महाराष्ट्र शासनाची शैक्षणिकरित्या स्वायत्त संस्था)
शिवाजी विद्यापीठ रोड, विद्यानगर, कोल्हापूर – ४१६००४
दूरध्वनी क्र. ०२३१-२५२१०३८, २५३१०३८,२५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com Website : www.gpkolhapur.ac.in
· AICTE Permanent ID : 1-475576863 · DTE Code : 6010 · MSBTE Code : 0011 · Est. Year : 1961

जा. क्र. शातंनिको/परीक्षा विभाग/२०२६/ 59 दिनांक - 3/02/2026

## महत्वाचे परिपत्रक :-

विषय :- दुसऱ्या ,चौथ्या व सहाव्या सत्रातील H-Scheme मधील R,R+RR,फक्त RR व G- Scheme मधील फक्त RR विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी परीक्षा २०२६ करीता परीक्षा अर्ज भरणे बाबत .

सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, दुसऱ्या ,चौथ्या व सहाव्या सत्रातील H-Scheme मधील R,R+RR,फक्त RR व G- Scheme मधील फक्त RR विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी परीक्षा २०२६ करीता परीक्षा अर्ज खालील दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Sr. no. | Activities | Filling Examination Forms (normal Fees) | Filling Examination Forms (With Exam form fees+ Late fees of Rs. 200/-) | Filling Examination Forms (With Exam form fees+ Penalty Rs. 1500/-) |
|---|---|---|---|---|
| 1 | Candidate Fill | 04 February 2026 To 10 February 2026 | 11 February 2026 To 17 February 2026 | 18 February 2026 To 23 February 2026 |
| 2 | HOD Confirmation | 04 February 2026 To 11 February 2026 | 12 February 2026 To 18 February 2026 | 19 February 2026 To 24 February 2026 |

- नियमित (R) परीक्षा विद्यार्थ्यांसाठी एकूण परीक्षा शुल्क ९०० रूपये.
  (सत्र परीक्षा रुपये ७००/- + चाचणी परीक्षा रुपये २००/-)
- नियमित (R+4RR) विद्यार्थ्यांसाठी एकूण परीक्षा शुल्क १७००/- रूपये.
- फक्त RR असलेल्या विषयासाठी रुपये २०० /-प्रति विषय.

१) परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे.
त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या www.gpkolhapur.ac.in ह्या संकेतस्थळावर (Website) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल ॲड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपूर्वक वाचून गरज असल्यास दुरुस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देण्यात येतील.

२)आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा, तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी.

पासवर्ड विसरल्यास रुपये१००/- इतके शुल्क भरून पासवर्ड घेता येईल.

३)सर्व विद्यार्थ्यांनी उन्हाळी सम सत्र २०२६ करीताचा परीक्षा अर्ज भरताना आपल्या विभागातील वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा.

४) विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरून Save केल्यानंतर, परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने भरावी.

५) त्यानंतर अर्ज कायम (confirm) करणे अनिवार्य आहे. अर्ज कायम (confirm) केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

अपवादात्मक परिस्थितीत वर्गशिक्षक यांचे कडून अर्जामध्ये बदल करून घ्यावा व त्यानुसार केलेल्या बदलाची खात्री करून सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

६) विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज आणि मागील मार्कशीट विभागप्रमुख यांनी नेमून देण्यात आलेल्या वर्गशिक्षक यांच्याकडे अर्ज कायम (confirm) करणेसाठी जमा करावे.

७) वर्गशिक्षकांनी अर्ज कायम (confirm) केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

८)परीक्षा अर्जामधील त्रुटी तसेच पात्रता विषयीची खातरजमा विभागाने आपल्या स्तरावरून मागील गुणपत्रिका तसेच विद्यार्थ्यांची Result History पाहून करावी.

अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा.

(कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत :-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर.
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीकरीता.
३. सर्व विभागाना जाहीर करणेकरीता.
४. संस्थेच्या संकेतस्थळावर (Website) प्रदर्शित करणे करीता.